# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८
# करआकारणी व करसंकलन विभाग

---

## जाहिर नोटीस

### नविन समाविष्ट गावातील मिळकतधारकांचे मार्च २०१० अखेरच्या मिळकतकर थकबाकी माफीबाबत

या जाहिर नोटीशीद्वारे सर्व संबंधितांना कळविणेते येते की, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत सन १९९७ मध्ये समावेश झालेल्या तळवडे, चिखली (उर्वरीत), मोशी (उर्वरीत), डुडूळगाव, वडमुखवाडी, दिघी (उर्वरीत), भोसरी (उर्वरीत), सांगवी (औंध उरो रुग्णालय), पिंपळे निलख (उर्वरीत) वाकड (उर्वरीत), पूनावळे, किवळे, मामुर्डी (उर्वरीत), चोवीसवाडी (उर्वरीत) च-होली बुद्रुक (उर्वरीत), बोपखेल (उर्वरीत), रावेत (उर्वरीत) गावातील मिळकतधारकांचे मिळकत करासंबंधी महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांनी शासन निर्णय क्रमांक - पीसीसी३००७/३८४/प्र.क्र.१९२/२००८/ नवि-२२, दिनांक २६ एप्रिल २०१० अन्वये या समाविष्ट गावांकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ (१अे) नुसार मालमत्ता कराचे थकबाकीबाबत माफी / सवलत देण्यास मान्यता दिली आहे.

शासन निर्णयाप्रमाणे या नोटीसीद्वारे वरील नमूद गावातील सर्व संबंधितांना कळविणेत येते की, सन २०१०-२०११ या वर्षाचे मिळकतकराचे बिलाप्रमाणे, बिलामधील चालू मागणीची संपूर्ण रक्कम भरणा करावी. शासन निर्णयाचा लाभ घेणेकरीता खालीलप्रमाणे मिळकतकर भरणेकामी वेळापत्रक निर्धारित करणेत येत आहे.

### वेळापत्रक

| अ.क्र. | मिळकतकराची रक्कम भरणेस कालावधी | थकबाकी माफी तपशील |
|---|---|---|
| १ | **दिनांक ३० जून २०१० अखेर सन २०१०-२०११ वर्षाची मालमत्ता व शासकीय कराची रक्कम भरणा केल्यास** | **मार्च २०१० पूर्वीची थकबाकी १०० टक्के माफ** |
| २ | **दिनांक ३१ जुलै २०१० अखेर सन २०१०-२०११ वर्षाची मालमत्ता व शासकीय कराची रक्कम भरणा केल्यास** | **मार्च २०१० पूर्वीची थकबाकी ८० टक्के माफ व उर्वरीत २० टक्के भरणा करणे आवश्यक राहील** |
| ३ | **दिनांक ३१ ऑगस्ट २०१० अखेर सन २०१०-२०११ वर्षाची मालमत्ता व शासकीय कराची रक्कम भरणा केल्यास** | **मार्च २०१० पूर्वीची थकबाकी ५० टक्के माफ व उर्वरीत ५० टक्के भरणा करणे आवश्यक राहील** |
| ४ | **दिनांक ०१ सप्टेंबर २०१० नंतर सन २०१०-२०११ वर्षाची मालमत्ता व शासकीय कराची रक्कम भरणा केल्यास** | **मार्च २०१० अखेरची संपूर्ण थकबाकी भरणा करावी लागेल.** |

मिळकतकराचे चालू वर्षाचे बिल व शासन निर्णयानुसार नोटीस वाटप करण्याचे काम चालू असून ज्या मिळकतधारकास बिल व नोटीस प्राप्त झाले नाही. त्यांनी करसंकलन विभागीय कार्यालयाशी संपर्क साधून बिल व नोटीस प्राप्त करुन घ्यावे व वरील वेळापत्रकाप्रमाणे मिळकतकराची रक्कम भरुन शासन निर्णयाचा लाभ घ्यावा.

तसेच या नोटीसीद्वारे सर्व संबंधितांना स्पष्टपणे कळविणेत येते की, यापुढे मालमत्ता करासंदर्भात कोणतीही अशा स्वरुपाची सवलत आपणास देणेत येणार नाही. तसेच आपणास यापुढे कोणतीही मालमत्ता कर विषयक सवलत अनुज्ञेय राहाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

जाहितरात क्रमांक : ३५
दिनांक : १७/०५/२०१०